दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS
● वर्ष २ रे ● अंक ०२ रा ● रविवार १९ मे २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 02 | Date : 19/05/2024 blow Sunday Page 4 Price 4

गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..
दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

## राज्यात आठ दिवस पावसाचा मुक्काम; ■ मोसमी वाऱ्यांबाबतही गुड न्यूज ■

पुणे : राज्यात गेल्या आठ ते दहा दिवसांपासून सुरू असलेला अवकाळी पावसाचा मुक्काम आणखी वाढणार आहे. शुक्रवारपर्यंत (२४ मे) मराठवाडा, विदर्भात सर्वांत अधिक अवकाळी पाऊस पडणार असून, मध्य महाराष्ट्रातील काही भागात गारपीट, तर कोकणात गरमी आणि आर्द्रता वाढणार आहे, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

ईशान्य राजस्थानपासून उत्तर मध्य महाराष्ट्रापर्यत द्रोणीय स्थिती कार्यरत असून, त्याची तीव्रता कायम आहे. याशिवाय मराठवाडा ते तामिळनाडूपर्यंत (कर्नाटक पार करून ) द्रोणीय स्थिती असून, त्याचा प्रभाव वाढला आहे. या स्थितीमुळे राज्यातील विदर्भ आणि मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांना हवामान विभागाने 'यलो अलर्ट' दिला आहे. या भागात ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहणार असून, विजांचा कडकडाट, मेघगर्जनेसह जोरदार पाऊस हजेरी लावणार आहे.

राज्यातील कमाल तापमानात घट झाली आहे. तरीदेखील उकाडा आणि उष्णतेच्या झळा कायम आहेत. राज्यात शनिवारी जळगाव येथे सर्वाधिक ४३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. मुंबई, पालघर, ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या भागात पुढील तीन दिवस उष्णतेची लाट आणि आर्द्रता कायम राहणार आहे. मात्र, या भागात दुपारनंतर पावसाच्या हलक्या सरी पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील अवकाळी पाऊस कमी झाला आहे.

मात्र, पुढील दोन दिवसांत या भागातील काही जिल्ह्यांत गारपीट होण्याची शक्यता आहे किंवा तुरळक ठिकाणी पाऊस पडेल, असाही अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. राज्यात गेल्या आठ ते दहा दिवसांपासून अवकाळी सुरू असल्यामुळे बहुतांश भागातील कमाल तापमान ४० अंशांच्या खाली आले आहे. तरीदेखील



दुपारपर्यंत कडक ऊन, दुपारनंतर पावसाची हजेरी, तर रात्रभर उकाडा अशी स्थिती कायम आहे.

**यलो अलर्ट कोणत्या जिल्ह्यांना ?**

नांदेड, लातूर, धाराशिव, अकोला, अमरावती, बुलडाणा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ - (२४ मेपर्यंत), तर जळगाव, पालघर, ठाणे, मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, नगर, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, बीड, लातूर, हिंगोली (पुढील दोन दिवस) मोसमी वाऱ्यांना अनुकूल स्थिती अनुकूल स्थितीमुळे मोसमी वारे येत्या ४८ तासांत दक्षिण अंदमान समुद्रासह निकोबार बेटे, तसेच बंगालच्या उपसागरातील वायव्य बेटांवर दाखल होतील, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. वायव्य बंगालच्या उपसागरात २२ मे रोजी कमी दाबाचा पट्टा तयार होणार आहे, तर २४ मे रोजी बंगालच्या उपसागरातील याच कमी दाबाचे रूपांतर तीव्र कमी दाबाच्या पट्ट्यात होणार आहे. ते मध्यपूर्व बंगालच्या उपसागरापर्यंत असणार आहे. या दोन्ही स्थिती मोसमी वारे दाखल होण्यास अनुकूल आहेत. या स्थितीची तीव्रता कायम राहिल्यास केरळमध्ये वेळेपूर्वीच मोसमी वारे दाखल होतील, असाही हवामान विभागाचा अंदाज आहे.

## गोव्यातील कंपनीकडून अक्कलकोटच्या ठेवीदारांना गंडा

अक्कलकोट/प्रतिनिधी : अवघ्या सहा महिन्यांत दामदुप्पट परतावा देण्यासह इतर आकर्षक बक्षिसे देण्याचे आमीष दाखवून गोव्यातील एका कंपनीने अक्कलकोटमध्ये अनेक मध्यमवर्गीयांकडून लाखोंच्या ठेवी गोळा केल्या. नंतर सर्व ठेवीदारांची फसवणूक केल्याचा प्रकार उजेडात आला आहे.यासंदर्भात ठेवीदारांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गोव्यातील दी युनायटेड ग्रुप आफ कंपनीच्या दोघा संचालकांसह चौघाजणांविरूध्द अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधाचे संरक्षण कायद्याखाली गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत मनोज शिवराज वाले (वय ४२, रा. समर्थनगर, अक्कलकोट) या शेतक-याने दिलेल्या फिर्यादीनुसार ३० डिसेंबर २०२३ ते २१ जानेवारी २०१४ या कालावधीत अक्कलकोटमध्ये एका हाटेलात हा फसवणुकीचा प्रकार घडला. मनोज वाले यांना हन्नूर (ता. अक्कलकोट) येथील प्रियांका शिवानंद पाटील या ठेवीदाराकडून दी युनायटेड ग्रुप आफ कंपनीच्या ठेव योजनेची माहिती मिळाली होती. कंपनीची माहिती घेण्यासाठी इच्छूक ठेवीदारांना गोव्यात येण्या-जाण्याच्या प्रवासासह तेथील हाटेलातील मुक्कामाचा खर्च कंपनी करणार आहे. ठेवीदारांना त्यांच्या ठेवीवर सहा महिन्यांत दामदुप्पट रक्कम देण्यासह ठेवीच्या रकमेवर दररोज एक टक्का परतावा मिळेल, ओळखीच्या व्यक्तींना या योजनेत सहभागी करून घेतल्यास १५ किलो सोने, महागड्या मोटारीपासून १५० बुलेट गाड्या बक्षिसापोटी देण्याचे कंपनीने दाखविले होते. नंतर अक्कलकोटमध्ये एका हाटेलात कंपनीने स्नेहमेळावा आयोजित करून शेकडो मध्यमवर्गीयांना ठेव योजनेची भुरळ घातली होती.

यानुसार मनोज वाले यांनी दोन लाख ४२ हजार १०० रूपयांची ठेवीस्वरूपात कंपनीत गुंतवणूक केली होती. तसेच प्रियांका शिवानंद पाटील, महादेव कळकप्पा हेगडे, जयश्री विश्र्वनाथ भरमशेट्टी व इतर अनेकांनी लाखो रूपयांची गुंतवणूक केली होती. परंतु अखेर यात फसवणूक झाल्याचे लक्षात येताच ठेवीदारांना धक्का बसला. कंपनीचा मुख्य व्यवस्थापकीय संचालक सलीम प्रकाश गौस व संचालिका प्रतीक्षा दशरथ मोठे (दोघे रा. गोवा) तसेच कंपनीचा ट्रेनर इंद्रजित माने व आनंद रामचंद्र टोणे (रा. फलटण, जि. सातारा) हे आरोपी असून त्यांचा शोध पोलीस घेत आहेत.

## उजनी धरणातील गाळ काढण्यासाठी समितीचा सकारात्मक अहवाल

सोलापूर/प्रतिनिधी : राज्यातील प्रमुख मोठ्या धरणांपैकी उजनी धरणातील गाळ काढण्याबाबत शासनाने दुस-यांदा गठीत केलेल्या समितीने सकारात्मक अहवाल सादर केला आहे. त्यामुळे धरणातील गाळ काढण्याच्यादृष्टीने शासनाकडून लवकरच अध्यादेश जारी होण्याची अपेक्षा आहे. एका पाहणीनुसार या धरणात सध्या १४ टीएमसी एवढा गाळ साचला असून तो काढल्यास तेवढ्याच प्रमाणावर धरणात पाणीसाठवण क्षमता वाढणार आहे.

मागील वर्षाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उजनीसह जायकवाडी (छत्रपती संभाजीनगर), गोसी खुर्द (भंडारा), गिरणा (नाशिक) आणि मुळा (अहमदनगर) आदी पाच धरणांतील साचलेला गाळ काढण्याची घोषणा केली होती. त्यासाठी मानके तयार करण्यासाठी तज्ज्ञांच्या समितीमार्फत



मागविण्याचे ठरले होते. त्यानुसार समिती गठीत झाली होती. परंतु तांत्रिक कारणांमुळे या समितीला संपूर्ण अहवाल सादर करता आला नव्हता. त्यामुळे पुन्हा नव्याने दुसरी समिती गठीत झाली होती. या समितीने आपला अहवाल नुकताच शासनाला सादर केला आहे. उजनी लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता धीरज साळे यांनी ही माहिती दिली.

सोलापूर जिल्ह्यासाठी वरदान मानले गेलेल्या आणि शेतीकारण, अर्थकारण, समाजकारण आणि राजकारणाचे केंद्रबिंदू मानल्या जाणा-या महाकाय उजनी धरणी धरणाची उभारणी १९८०-८१ साली पूर्ण झाली होती. त्यानंतर ४३ वर्षांत धरणात मोठ्या प्रमाणात साचलेला गाळ प्रथमच काढण्यात येणार आहे. त्यासाठी मोठा खर्च अपेक्षित आहे। **पान २ वर**

## मतदान आकडेवारीवर सात दिवसांत उत्तर द्या!
### सर्वोच्च न्यायालयाचे निवडणूक आयोगाला आदेश

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्याची आकडेवारी मतदानाच्या ४८ तासांच्या आत जाहीर करा, या मागणीच्या याचिकेवर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. न्यायालयाने याचिकेची गंभीर दखल घेत सात दिवसांत उत्तर देण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले आहेत. सरन्यायाधीश डॉ. डी. वाय. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर याप्रकरणी सुनावणी झाली.



देशात लोकसभा निवडणूक अंतिम टप्प्यात असून, सोमवारी पाचव्या टप्प्याचे मतदान होत आहे. निवडणूक आयोगाने यापूर्वी जाहीर केलेल्या मतदानाच्या आकडेवारीवर संशय व्यक्त केला जात आहे. निवडणूक आयोगाने पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्याची मतदान आकडेवारी अनुक्रमे ११ आणि ५ दिवसांनी जाहीर केली. त्यातही अनुक्रमे ७ आणि ५ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली. यावर आक्षेप घेत असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक । **पान २ वर**

## हरियाणात बसला आग, नऊ मृत्युमुखी

गुरुग्राम : हरियाणाच्या नुह जिल्ह्यामध्ये तौरु या गावाजवळ एका धावत्या बसला आग लागून किमान नऊ जणांचा जळून मृत्यू झाला आणि अन्य १५ जण जखमी झाले. शनिवारी पहाटे ही घटना घडल्याचे पोलिसांनी सांगितले.ही बस शनिवारी पहाटे दोन वाजता कुंडली-मानेसर-पलवल (केएमपी) द्रुतगती मार्गावर धावत असताना तिला आग लागली. बसमध्ये जवळपास ६० प्रवासी मथुरा आणि वृंदावन येथून परत येत होते. ते सर्व जण एकमेकांचे नातेवाईक असून पंजाबमधील होशियारपूर आणि लुधियाना येथील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.पोलीस निरीक्षक आणि सदर तौरुचे ठाणेदार जितेंद्र कुमार



यांनी सांगितले की, या अपघातात सहा महिला आणि तीन पुरुषांचा मृत्यू झाला. १५ जण जखमी झाले आणि त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सर्व जखमींची प्रकृती स्थिर आहे. बसला आग लागण्याचे कारण अद्याप निश्र्चित झालेले नाही, त्याचा तपास सुरू आहे अशी माहिती त्यांनी दिली.तौरुमधील एका स्थानिक रहिवाशाने सांगितले की, आग लागल्याचे लक्षात आल्यानंतर काही लोकांनी मोटारसायकलवरून बसचा पाठलाग केला आणि चालकाला बस थांबवण्यास सांगितले. त्यांनी पोलीस आणि अग्निशमन दलालाही या आगीची माहिती दिली.

## श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचे पदस्पर्शदर्शन २ जून पासून होणार सुरू : सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर



*** आषाढी यात्रा कालावधीत भाविकांना आवश्यक सोयी सुविधांची उपलब्धता * आषाढी यात्रेसाठी २००० कर्मचारी व स्वयंसेवकांची नियुक्ती**

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन व जीर्णोद्धार कामे पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली शासन निधीतून सुरू असून, त्यामध्ये श्री विठ्ठल गाभारा व रुक्मिणी गाभारा येथील संवर्धनाचे काम १५ मार्चपासून सुरू करण्यात आले आहे. सदरचे काम पूर्णत्वास येत असून भाविकांसाठी दिनांक २ जून २०२४ पासून श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे पदस्पर्शदर्शन सुरू करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदीर संवर्धन कामांबाबत तसेच आषाढी यात्रापुर्व नियोजनाबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस सदस्या शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्र्वर देशमुख जळगावकर, ॲड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरुजी, ह.भ.प. शिवाजीराव मोरे तसेच कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहने, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे, ठेकेदार रमेश येवले व सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

यावेळी सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर म्हणाले, श्री विठ्ठल गाभारा व रुक्मिणी गाभारा येथील संवर्धनाचे काम करतेवेळी मूर्तीच्या संरक्षणास कुठल्याही प्रकारची बाधा येणार नाही, याची दक्षता घेऊन तसेच मूर्ती संरक्षणास प्राधान्य देऊन कामास सुरुवात करण्यात आली. सदरचे काम करत असताना काही नव्याने कामे निदर्शनास आल्याने या कामांसाठी ४५ दिवसापेक्षा जास्त कालावधी लागला आहे. सदरचे काम पूर्णत्वास येत असून, संवर्धनाचे काम दर्जेदार व पुढील अनेक वर्ष टिकेल या दृष्टीने करण्यात आले आहे. याशिवाय, २ जून पासून भाविकांच्या शुभहस्ते पूजा देखील सुरू करण्यात येणार आहेत. तसेच आषाढी यात्रेच्या अनुषंगाने करावयाच्या नियोजनाचा आढावा घेऊन भाविकांना अधिकाधिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या.

आषाढी यात्रा दिनांक १७ जुलै, २०२४ रोजी संपन्न होत असून, आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी मोठया प्रमाणात भाविक येतात. येणाऱ्या भाविकांना सुलभ व तात्काळ दर्शन व्हावे यासाठी मंदीर समितीकडून आवश्यक ते नियोजन करण्यात आले आहे. तसेच दर्शन रांग, पत्रा शेड, दर्शन मंडप या ठिकाणी भाविकांना अधिकच्या सोयी-सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. यासाठी दोन हजार कर्मचारी व स्वयंसेवकाची नेमणूक करण्यात येणार आहे. या यात्रेला भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन, दिनांक ०७ ते २६ जुलै दरम्यान २४ तास दर्शन सुरू करण्यात येणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

यावेळी दर्शनरांग व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन, यात्रेतील प्रथा व परंपरा, सुरक्षा व्यवस्था, दर्शनरांगेतील अन्नदान, वैद्यकीय व्यवस्थेचे स्टॉल, स्वच्छता व्यवस्था, शासकीय महापूजा, लाईव्ह दर्शन व्यवस्था, देणगी व्यवस्था, निवास व्यवस्था, अपघात विमा पॉलिसी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सीसीटीव्ही व वायरलेस यंत्रणा, लाडू प्रसाद व्यवस्था, महिलांसाठी चेंजिंग रूम, हिरकणी कक्ष व विश्रांती कक्ष इत्यादी व्यवस्थेचा आढावा घेवून आषाढी यात्रेच्या अनुषंगाने करावयाच्या नियोजनाचा आढावा घेऊन भाविकांना अधिकाधिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना प्रशासनास केल्याची माहिती दिली. तत्पुर्वी श्री विठ्ठल गाभारा व रुक्मिणी गाभारा येथील सुरु असलेल्या कामांची पाहणी मंदिर समितीचे सर्व सदस्य यांनी पुरातत्त्व विभाग, वास्तुविशारद व ठेकेदार यांच्या समवेत केली व संबधितांना आवश्यक सुचना यावेळी दिल्या.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय


### हे थांबविले पाहिजे...

भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून बिहारमधील बेगुसराई हे जगातील सर्वाधिक प्रदूषित महानगर क्षेत्र तर जगातील १३४ देशांच्या राजधानीच्या शहरांपैकी दिल्ली हे सर्वात प्रदूषित राजधानीचे शहर असल्याची नोंद या अहवालात करण्यात आली आहे. या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३४ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ७३०० शहरांची माहिती संकलित करण्यात आली. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, मुंबई, बेगुसाराई, गुवाहाटी, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यासारख्या मोठ्या आणि महत्वाच्या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले. स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर आली होती. प्रदूषणामुळे दिल्लीत खेळला जाणारा रणजी सामना रद्द करावा लागला होता. चार वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा होता त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई - दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम - विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे.

## व्यवस्थेला चिरफाड करणारी कविता : 'काहूर वेदनेचे'

### ■ मुन्नाभाई नंदागवळी ■

कवी कालिदास सूर्यवंशी हे सोजवळ आणि संयमी शांती रुपी व्यक्तिमत्व आहेत. गेल्या काही वर्षापासून आमची ओळख झाली आणि मला त्यांनी आपल्या मनात जागा दिली. तेव्हापासून आम्ही दोघे संपर्कात आहोत. साहित्य आणि पत्रकारिता हा आमच्या दोघांचा पिंड आहे म्हणता येऊ शकते. आम्ही लोकमतला काम करतो. तर अशाप्रकारे आमची गट्टी जमली आणि कवी कालिदास सूर्यवंशी यांच्याशी नाळ जुळली. ही नाळ फार घट्ट झाल्यासारखी वाटते. मग ते म्हणाले, माझा दुसरा कविता संग्रह येत आहे. त्यासाठी काही मदत हवी आहे, म्हणून पीडीफ करायचे काम आणि व्याकरणाच्या काही दुरुस्त्या करण्याचे काम मला त्यांनी दिले. त्यांचे मनोगत लिहिताना काही चुका सुधारता आल्या, आणि 'अंतर्मनातील काहूर' हे नाव दिले. त्यांना आवडले आणि माझ्या पाठीवर सहानुभूतीचा हात आशीर्वादाने मांडला. त्यांनी मला आंबेडकरवादी साहित्याचे ग्रंथ (पुस्तके) माझ्या प्रबंध लिखणाच्या कामास मदत होईल म्हणून दिले, त्यामुळे आणखीनच या नात्यात भर पडली. असेच लोक मला प्रेम देत आपलासा करतात. आणखी काय हवे जीवनात.




'काहूर वेदनेचे' या काव्यसंग्रहाला नामवंत कवी व समीक्षक डायरीकार प्रा. युवराज गंगाराम यांनी अत्यंत महत्वपूर्ण प्रस्तावना लिहिली आहे. 'प्रस्तावनाच कवितासंग्रहाची आत्मा असण्याचे मौलिक कार्य करत असते असे म्हणायला काही हरकत नाही.' कालिदास सूर्यवंशी यांनी हे कविता संग्रह महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समर्पित केले आहे. कोरोना काळातील कविता असल्याचे त्यांनी उल्लेख केले आहे. त्याबरोबर अनेक महापुरुषांच्या विचारांनी प्रेरित होऊन कवी कालिदास सूर्यवंशी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, पत्रकारिता आणि साहित्य क्षेत्रात त्यांचा मोठा वाटा दिसून येत आहे.

संग्रहात त्यांनी अनेक समाजामध्ये होणारे अन्याय, अत्याचार, जुलूम ह्या लोकशाहीच्या देशात होत आहेत. यावर जालीम उपाय किवा लोकजागृती करणारे, बंड करून उठणारे काम या कवितेच्या रूपाने केल्याचे नोंद झालेच आहे. कविता वाचून मला थांबता आलेच नाही म्हणून...

सांग स्वातंत्र्या येथे का हे मरण स्वस्त आहे?<br>
माणुसकी मुसली आतंकवाद पेटले आहे,<br>
धर्माच्या नावावर हिंसाचार माजले आहे<br>
कुठे आंदोलन, मोर्चे, गोळीबार सूरु आहे.

कवी आवाहन कवितेमध्ये मोठ्या आक्रांताने देशाबद्दल अनेक बाबी बोलताना त्यांच्या मनात एक प्रचंड राग आला आहे. देशात आंदोलन, मोर्चे, गोळीबार आणि माणसाला माणूस न समजणारा आतंकवाद धर्माच्या नावावर पेटला आहे. यामध्ये जीव कसा रमणार आहे. अनेक निष्पाप जीवांचे जीव जाताना कवी डोळ्याने पाहतो आहे. म्हणून कवीच्या मनातील हे 'पेटलेले काहूर' आहे.

विद्या हेच श्रेष्ठ धन, पुढे नाही अवकळा<br>
जीवनाच्या उद्धारार्थ, शिक आता तरी शाळा

आपल्या समाजाला किवा देशातील प्रत्येक घटकाला शिक्षण घेणे हे महत्वाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ३२ पदव्या घेऊन या जगात विद्येचा महासागर झाला. याची दाखल अनेक देशांनी घेतली आहे. 'जगातील विद्वनात आमच्या बापाचा नाव आहे हे आमच्यासाठी मोठी गर्वाची गोष्ट आहे.' त्यामुळे कवी बालकामगार कवितेमध्ये समाजातील घटकांना, युवकांना संदेश देतात. तुझी वय नाही काम करण्याची, जरी गरिबी असली तरी, आपण शिकलो पाहिजे तरच जीवनाचे कल्याण होईल.

कबीरा तुझ्या विद्यापीठातील<br>
तत्वज्ञानासमोर<br>
ब्राम्हण, पंडीत, मुल्ला, काजी<br>
सर्व कवडीमोल ठरले आहेत,<br>
कबीर तू महाकवी आहेस.

कवीने कबीरा कवितेत जबरजस्त दाखला कबीरांचा देऊन एक नवा क्षितीज उमटवला आहे. कवीचे गुरु डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महामानव बाबासाहेब आंबेडकरांचे गुरु बुद्ध, कबीर, फुले हे गुरु. गुरूच्या गुरूला केलेला हा प्रश्न्न आहे. कबीराला काजीने प्रश्न्न केला तुझी जात कोणती ते कबीर उत्तरले आणि मदरशाचा दरवाजा कायमचा बंद झाला. तेव्हा कबीर कोणत्याच शाळेत गेला नाही. स्वतःच्या ज्ञानावर कबीराने जगात मोठे नाव कमावले आहे. त्यामुळे ब्राम्हण, पंडीत, मुल्ला, काजी हे त्यांच्याच गंगेत वाहून गेले. आज काबिरच एक विद्यापीठ झाले, एक महाकवी झाले. कबीराची क्रांती कवीला आणि कवीच्या जीवनाला कलाटणी दिली, असे म्हणणे योग्य ठरू शकते.

'बाबा' तू सूर्य आम्हासाठी...!

महार जातीच्या बाहेर, कुपाच्या बाहेर मग गावाच्या बाहेर. अशी आमची जिंदगी होती. बाबा, आम्ही कुत्र्यासारखे जगत होतो. आम्हाला उत्तम वागणूक नव्हती. पण तुझ्या कार्याने आम्ही आज खूप महत्वाचे जीवन जगात आहोत. तू आमच्यासाठी सूर्य झालास आणि आमच्या जगण्याला नवी उर्जा दिली. तू केलेस समाजाचे परिवर्तन म्हणून आम्हाला समाजात मोठे स्थान मिळाले आहे. बाबा, तूच आमचे जीवन आहे. तुझ्यामुळे आज आम्ही साहेब झालो, सुटाबुटात आलो.

आई म्हणे लेकराले<br>
चटणी भाकर खाजो<br>
रोज शाळेमधे जाजो<br>
आणि भिमावानी होजो<br>
शील, प्रज्ञा, करुणा घेजो<br>
पण भिमावानी होजो...

प्रत्येक आई वडिलांना वाटते की, आपला मुलगा शिकला पाहिजे. मोठा झाला पाहिजे. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखा झाला पाहिजे. अशीच कृती कवीच्या आईने केलेली आहे. पोटात चटणी खा, भाकर खा. पण शाळा शिका, उच्च शिक्षण घ्या असा मूलमंत्र आई देतात. त्याबरोबर तथागत बुद्धांनी देलेली शिकवण ही जीवनात उपयोगात आणून आचरण केले पाहिजे ही अपेक्षा आईकडून होते. कवीच्या अंगात बाबासाहेब आंबेडकर हे भिनलेले आहेत. त्यामुळे बाबासाहेब यांचे बोट धरून कवीने पुढे जावे असे त्यांच्या आईचे वरील ओळीमध्ये मत आहे.

रिपब्लीकन नेत्याला प्रश्न्न केला<br>
कोठेही ? कसा गा ?<br>
तो उत्तरला-<br>
भाड में गयी जनता<br>
अपून का काम बनता<br>
जय भीम.. जय भारत..

प्रस्तुत कवितेमध्ये कवींनी एक महत्वाचा विषय हाताळला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाची निर्मिती केली. तेव्हा हा पक्ष सुरळीत होता. बाबासाहेब यांचे निर्वाण झाले आणि पार्टीचे चार तुकडे केल्या गेले. प्रकाश आंबेडकर, रा. सु. गवई, जोगेंद्र कवाडे आणि रामदास आठवले या लोकांनी रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाची वाटाघाटी केली. आपापला पक्ष केला आणि निळा झेंडा वाटून घेतला. यावर कवी कालिदास सूर्यवंशी यांनी फार चिंतन व्यक्त केले. स्वतःचे स्वार्थ साधण्यासाठी, आपली पोळी भाजण्यासाठी निळा झेंडा वाटप केला. तरी वरून हेच नेते जयभीम म्हणतात. थोली तर लाज असायला पाहिजे ? तेव्हा याचे मोठे दुःख मनाला वाटते. ही अवस्था फार गंभीर आहे. कुठे गेले आमचे आंबेडकरी नेते ?

अरे सारा जग बुद्ध धम्माकडे वळतो आहे<br>
तू मात्र धम्मद्रोही बनून<br>
भलत्याच मार्गाने पळतो आहे...

कवी कालिदास सूर्यवंशी यांनी अत्यंत मार्मिक वेदना मांडली आहे. अनेक बाबींचे काहूर कवीच्या मनात होते. वेदना सहन होत नाही. बुध्दापासून तर बाबासाहेब यांच्या पर्यंत 'धम्म' वाढविणे आणि प्रसार करणे हे सर्वांचे काम आहे. जग हे बुद्धमय करायचे स्वप्न आपण उपासकांनी केला पाहिजे. त्याबरोबर भिख्खूसंघ यांनी पण केला पाहिजे. जग बुद्ध यांच्याकडे जात आहे. पण आपला माणूस हा भलत्या मार्गाला जातो आहे. जगातील 'विज्ञानवादी, सम्यक मार्ग, चार आर्यसत्य, आठ अष्टांगिक मार्ग, दहा पारमिता, बावीस प्रतिज्ञा' आदी आम्हाला माणूस जगण्यासाठी दिल्या आहेत. पण आंबेडकरी समाजाचा माणूस या सर्व गोष्टी सोडून तो थोतांडी, कर्मकांडी, रूढी, परंपरा यांच्या हिंदुत्वादी मार्गाला जोपासतो आहे. हे कलंकित आहे. असा खरा बौद्ध होऊ शकत नाही. असे अनेक उदाहरण आहेत जे मनात काहूर माजवून टाकतात. अशा वेदना किती लपवणार आहोत.

आवाहन, आधी व आता, जगी अमर भीमराया, कीर्तन, पावसा नको लावू डोळे, माझ्या भीमाची पुण्याई, भीमाच्या संविधानामुळे, रक्ताचे नाते, झोपडीतली गरिबी, जल हेच जीवन, हाक, खंत, बा तुझ्यामुळे, दिवा जळे सारी रात्र, आदरांजली, मायभूच्या वीरा, तुझे रक्त सांडले तरी चालेल, जाणता राजा, अभियान कोरोना यौध्दा, दृष्टांत, तुक्यासाठी, संविधान, स्वार्थी जग, कर माझे जुळती, बाप, आजचे शिक्षण, बाबा तू नसता तर . समतेचे वारे, यौध्दा, विद्रोह, शिकार, अब्रु, विद्येची फुलबाग, ज्वाला बन तू, मेंढी नको वाघ बन, राष्ट्रपिता ज्योतिबा, सावित्री तू नसती तर.. जीव माझा जाते ग, महानायक, धन्य तुझे बलिदान, कसा होतास तू, काहूर वेदनेचे इत्यादी कविता सादर संग्रहात घेतल्या आहेत. कवी कालीदास सूर्यवंशी यांनी आपल्या वैचारिक बळाने कवितेमध्ये बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश देण्याचे उत्तम प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न त्यांचा सफल होयील अशी आशा बाळगतो.

कवीने बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर विचारधारा मांडण्याचा योग्य निर्णयक पायंडा होता. तो स्पष्ट दिसून येते. आंबेडकरांची निष्टा असलेला माणूस हा काही अंशी तरी परिवर्तन करून प्रबोधन करण्याचा प्रयत्न करत असतो.असंच माणस कवी कालिदास सूर्यवंशी यांनी केला आहे.सर्व कविता सुंदर आहेत. समाजाला याचे मार्गदर्शन होणार ही माझी खात्री आहे. वाचकांना आवडतील अशीही मनी इच्छा ठेवतो.या निमित्ताने कवीला खूप खूप शुभेच्छा. जयभीम !

**स्वरकाव्य निवास, येरंडी-बाराभाटी, ता. अर्जुनीमोरगाव,**
**जि. गोंदिया. मो. ९७६४६७६४९९, पिन-४४१७०२**

पान १ वरुन

### उजनी धरणातील गाळ ..

धरणात गाळमिश्रीत वाळू आहे. सुपीक शेतीसाठी गाळ शेतक-यांना उपलब्ध करून देता येईल. तर वाळू काढून त्याची विक्री केल्यास मोठ्या प्रमाणात महसूल मिळू शकणार आहे. गाळ काढण्यासाठी होणा-या खर्चापेक्षा जास्त महसूल वाळू विक्रीतून होईल, अशी अपेक्षा आहे.

यासंदर्भात शासनाने गठीत केलेल्या समितीने अंतिम अहवाल सादर केला आहे. धरणात गाळामध्ये ५० टक्के वाळू असून त्यानुसार वाळू, रेती आणि इतर घटक वेगळे करण्याचे नियोजन आहे.

गाळ काढण्यासाठी किती मीटर खोल जायचे, गाळ काढताना जलाशयातील जीवसृष्टीला हानी न पोहोचण्यासाठी अकास्टिकवाहिनीचा वापर करणे, जलाशयाचा परीघ किती, हे ठरवून त्याप्रमाणे गाळ काढण्यासाठी जलाशयात पोहोचण्याकरिता तात्पुरते रस्ते तयार करणेआदी बाबींचा अभ्यास करण्यात आला आहे.

उजनी धरणात मागील वर्षी पावसाळ्यात अत्यल्प पावसामुळे जेमतेम ६०.६६ टक्के पाणीसाठा झाला होता. परंतु नंतर चुकीच्या पाणी वाटप नियोजनामुळे धरणातील पाणीसाठा लवकर खालावला. गेल्या जानेवारीमध्ये हिवाळ्यातच धरणातील पाणीसाठा वजा पातळीवर गेला असून सध्या पाणीसाठा वजा ५३ टक्के एवढा खालावला आहे. त्याचा विचार करता धरणातील गाळ काढण्याची संधी आहे.

### मतदान आकडेवारीवर सात

रिफॉर्म (एडीआर) या स्वयंसेवी संस्थेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. मतदानानंतर ४८ तासांच्या आत मतदानाची अंतिम आकडेवारी निवडणूक आयोगाने संकेतस्थळावर जाहीर करावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने प्रशांत भूषण यांनी बाजू मांडत तत्काळ सुनावणी घेण्याची मागणी केली. त्यावर न्यायालयाने निवडणूक आयोगाला नोटीस बजावून सात दिवसांच्या आत उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत.

## कोकणात १ जूनपासून सागरी मासेमारीवर बंदी

अलिबाग : कोकण किनारपट्टीवर १ जून ते ३१ जुलै या कालावधीत खोल समुद्रात मासेमारी करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. मत्स्यव्यवसाय विभागाने याबाबतचे आदेश जारी केले आहेत. बंदी काळात मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांवर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या कालावधीमध्ये मासळी व सागरी प्राण्यांचे मोठया प्रमाणात प्रजनन होत असते. तसेच समुद्रात नद्यांव्दारे मोठया प्रमाणात खनिजद्रव्य वाहत जातात. त्याचप्रमाणे क्षारतेचे प्रमाण कमी होते आणि समुद्राच्या तळातील मुलद्रव्ये पाण्याच्या वरच्या थरात येतात. त्यामुळे प्लवंग निर्मिती मोठया प्रमाणावर होऊन मासळीच्या लहान जीवांना पोषक वातावरण तयार होते.

## महात्मा गांधींना अभिमान वाटत असेल की त्यांचा पणतू; तुषार गांधींच्या 'त्या' टीकेला वंचित बहुजन आघाडीचं प्रत्युत्तर!

मुंबईः पूर्वीच्या निवडणुकांचा इतिहास बघितला तर वंचित बहुजन आघाडीने 'छुपा रुस्तम' म्हणून काम केलं आहे. मतांचं गणित बिघडवण्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी उमेदवार उभे केले, अशी टीका महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांनी केली होती. या टीकेला आता वंचित बहुजन आघाडीने प्रत्युत्तर दिलं आहे. त्यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. आज तुषार गांधी यांनी एबीपी माझा या वृत्तवाहिनीशी बोलताना वंचित बहुजन आघाडीवर जोरदार टीका केली होती. पूर्वीच्या निवडणुकांचा इतिहास बघितला तर वंचित बहुजन आघाडीने 'छुपा रुस्तम' म्हणून काम केलं आहे. मतांचं गणित बिघडवण्यासाठीच त्यांनी अनेक ठिकाणी उमेदवार उभे केले. या निवडणुकीत महाविकास आघाडीने त्यांना पर्याय दिला होता. ते इंडिया आघाडीत येऊ शकले असते. त्यांनी व्यावहारिक मागणी केली असती, तर इंडिया आघाडीनेही त्यांना घेतलं असतं. पण ते ठरवूनच आले होते. त्यांना जबाबदारी दिली होती. आणि त्यांनी त्यांचे काम पूर्ण केलं, असे ते म्हणाले होते.याबरोबरच एखाद्या जागेवर तुम्हाला मतं किती मिळतात आणि तुम्ही किती नुकसान करता, यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात. त्यामुळे महाविकास आघाडीत घेताना वंचित बहुजन आघाडीवर अन्याय झाला असं म्हणता येणार नाही. त्यांची जी



क्षमता होती, त्यानुसार त्यांना जागा देण्याचे आश्र्वासन देण्यात आलं होते, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली होती.

दरम्यान, तुषार गांधींच्या या टीकेला आता वंचित बहुजन आघाडीने प्रत्युत्तर दिलं आहे. तुषार गांधींनी वंचित बहुजन आघाडीचं केलेलं विश्र्लेषण आम्ही ऐकलंय. त्याबद्दल आम्हाला काही बोलायचं नाही. त्यांच्या आजोबांसारख्याच त्यांच्याही जातीय भावना आहेत. महात्मा गांधींना वंचित वर्गासाठी (आताच्या अनुसूचित जातीसाठी) स्वतंत्र मतदार नको होते. आता त्यांचे पणतू तुषार गांधी यांनाही वंचित आणि बहुजनांच्या पक्षाने निवडणूक लढवावी आणि त्यांच्या जवळही स्वतंत्र राजकीय विचार आणि नेतृत्व असावे, असे वाटत नाहीये. महात्मा गांधींना याचा नक्कीच अभिमान वाटत असेल की, त्यांचा पणतू त्यांच्या सडलेल्या जातीयवादी विचारसरणीचा आणि अनुसूचित जातींबद्दलच्या वृत्तीचा वारसा पुढे नेत आहे, असे ते म्हणाले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीची गणेश धुमाळ यांना पीएचडी प्रधान

**पंढरपूर/प्रतिनिधी**

पंढरपूर तालुक्यातील कवठाळी गावचे सुपुत्र श्री गणेश संभाजी धुमाळ यांना पुणे येथील एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग क्षेत्रातील पीएचडी प्रदान करण्यात आली आहे त्यांच्या संशोधनाचा विषय डबल पाईप हिट एक्सचेंजर टी वि स्टेट टेप आणि हेलिकल टेप इन्सर्ट परफॉर्मन्स प्रेडिक्शन असा होता यांचा वापर कार्यक्षमता प्रेडिक्शन बॉयलर रिनोव्हेबल एनर्जी सिस्टीम वेस्ट हिट रिकवरी यामध्ये होऊ शकतो गणेश धुमाळ यांनी पीएचडी दरम्यान उच्च नामांकित आंतरराष्ट्रीय एलसी व्हियर जनरल मध्ये तीन शोध निबंध प्रकाशित केले आहेत तसेच त्यांनी दोन आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये शोधनिबंध सादर केले यासाठी त्यांना प्रा डॉ संजय येना



हवालदार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. गणेश धुमाळ यांना त्यांच्या उल्लेखनीय यशासाठी गुरुकुल डॉक्टर रवी कुमार एम चिटणीस यांनी विद्यापीठातर्फे सत्कार करून अभिनंदन केले तसेच राहुल कराड अध्यक्ष डॉक्टर विश्र्वनाथ कराड डॉक्टर दिनेश शेठ डॉक्टर शिवप्रकाश बर्वे डॉक्टर कृष्णा वराडे यांचे सहकार्य लाभले व डॉक्टर गणेश धुमाळ हे युनायटेड स्टेट येथील मल्टिनॅशनल कंपनीमध्ये डेटा सायंटिस्ट पदावर काम करत आहेत त्यांच्या यशासाठी सर्व शहरातून अभिनंदन दादा वर्षाव केला जात आहे

# कवि सरकार इंगळी यांना जी .डी राठोड फौंडेशन राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

निफाड/प्रतिनिधी

हातकणंगले कोल्हापूर येथील जी डी फौंडेशन या प्रख्यात संस्थेचा इंगळी गावचे पत्रकार लेखक कवि सरकार इंगळी यांना . जी डी राठोड फौंडेशन राष्ट्रीय पुरस्कार २०२४ जाहीर झाला आहे. कवि सरकार इंगळी यांच्या पत्रकारीता व साहित्य क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांना राष्ट्रीय स्तरावरील जी डी राठोड या नावाने समाजभूषण हा पुरस्कार मान्यवरांचे हस्ते देऊन सन्मानीत करण्यात येणार आहे.सदर पुरस्कार वितरण सोहळा १९ मे २४ रोजी प्रजापिता ब्रम्हाकुमारी विश्र्वविद्यालय तटाकडील तालीम शिवाजी पेठ कोल्हापूर येथे संपन्न होणार आहे . या संस्थेचे व दैनिक रोखठोकचे कार्यकारी संपादक डॉ सुरेश राठोड व साप्ताहिक जन दर्शन व मुख्याध्यापक ज्ञानसिद्धी कॅडमीचे डॉ सुरेश राठोड यांनी निवडपत्र दिले आहे. सदरचा पुरस्कार बम्हाकुमारी सुनंदा बहिणजी प्रवक्त्या महाराष्ट्र व गोवा डॉ शिवाजी शिंदे उप



कुलसचिव पुण्यश्र्लोक अहिल्याबई विद्यापीठ सोलापूर ' मोहन गावकर गोवा ' सुरेश माडकर मु सं रोखठोक ' डॉ सुशिल अग्रवाल नि .सं रोखठोक ' योगसद्गुरू डॉ कृष्णदेव गिरी , सदानंद सदाशिव डी वाय एस पी कोल्हापूर ' दिपक मनटकर दै लोकमत प्रा डॉ आनंद गिरी साहित्यिक यांच्या उपस्थीत देणेत येणार आहे. कवि सरकार यांना निवड पुरस्कार जाहीर झालेने पत्रकार व साहित्य क्षेत्रात कौतुक होत आहे .

# लोकसभा निवडणुकीच्या मतदानासाठी मुंबई उपनगर जिल्ह्यात तयारी पूर्ण : जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांची माहिती

मुंबई उपनगर : लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातील चारही मतदारसंघातील निवडणुकीसाठी सोमवार २० मे २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या कालावधीत मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. मतदानाची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यात ७ हजार ३५३ एवढी मतदार केंद्रे असून रविवार १९ मे २०२४ रोजी सर्व मतदान पथके मतदान यंत्रासह रवाना होतील. मुंबई उपनगर जिल्ह्यातील मतदारांनी त्यांना दिलेला मतदानाचा हक्क जरुर बजावावा, असे आवाहन मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी आज येथे केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज दुपारी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी जिल्हाधिकारी श्री. क्षीरसागर बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी मनोज गोहाड, निवडणूक उपजिल्हाधिकारी तेजस समेळ, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रसाद खैरनार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. क्षीरसागर यांनी सांगितले की,लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यात २६- मुंबई उत्तर, २७- मुंबई उत्तर पश्र्चिम. २८- मुंबई उत्तर पूर्व, २९- मुंबई उत्तर मध्य या मतदारसंघांचा समावेश आहे. त्यासाठी २६ एप्रिल ते ६ मे २०२४ या कालावधीत उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया पार पडली. एकूण चार लोकसभा मतदारसंघात ८७ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. त्यात २६- मुंबई उत्तरमध्ये १९, २७- मुंबई उत्तर पश्र्चिम २१, २८- मुंबई उत्तर पूर्वमध्ये २०, तर २९- मुंबई उत्तरमध्ये २७ उमेदवार निवडणूक लढवित आहेत.

लोकसभेच्या मुंबई उपनगर जिल्ह्यातील चार मतदारसंघांत विधानसभेच्या २६ मतदारसंघांचा समावेश आहे. जिल्ह्यातील मतदारांची संख्या ७४ लाख ४८ हजार ३८३ मतदार असून पुरुष मतदारांची संख्या ४० लाख २ हजार ७४९, तर महिला मतदारांची संख्या ३४ लाख ४४ हजार ८१९ एवढी आहे. याशिवाय तृतीयपंथी मतदारांची संख्या ८१५ एवढी आहे. दिव्यांग मतदारांची संख्या १६ हजार ११६, तर ८५ वर्षांवरील मतदारांची संख्या ९८ हजार २६३ आहे. या चारही मतदारसंघात मतदान केंद्राची ठिकाणे १ हजार ८३ असून मतदान केंद्रांची संख्या ७ हजार ३५३ एवढी आहे. एकूण मतदान केंद्रांपैकी ५० टक्के मतदान केंद्रांवर वेब कास्टिंग केले जाणार आहे. मतदान केंद्रांवर मतदारांसाठी सावली, पाणी, एअर कुलर/पंखे, व्हीलचेअरसह मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ४ जून २०२४ रोजी नेस्को, गोरेगाव व उदयांचल शाळा, गोदरेज संकुल, विक्रोळी येथे मतमोजणी होईल.

लोकसभेच्या चारही मतदारसंघात मतदानासाठी ४० हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण झाले आहे. रविवार १९ मे २०२४ रोजी शेवटचे प्रशिक्षण पूर्ण होऊन मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी व कर्मचारी आपापल्या मतदान केंद्रावर आवश्यक साहित्यासह रवाना होतील. निवडणूक कर्तव्यावर नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसह अत्यावश्यक सेवेसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांपैकी आतापर्यंत २२ हजार ४४ मतदारांनी आपल्या टपाली मतदानाचा हक्क बजावला आहे, तर दोन हजार ५१३ ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांनी घरातूनच आपल्या मतदानाचा हक्क बजावला आहे. तसेच सक्षम पवर नोंदणी केलेल्या दिव्यांग मतदारांना घरापासून मतदान केंद्रापर्यंत नेण्यासाठी वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच ५४ लाख मतदारांपर्यंत मतदार चिठ्ठी पोहोचविण्यात आली आहे. ही सर्व प्रक्रिया रविवार १९ मे २०२४ पर्यंत पूर्ण होईल, असेही जिल्हाधिकारी श्री. क्षीरसागर यांनी सांगितले.

**मतदान केंद्रांपासून १०० मीटर परिसरात मोबाईल आणण्यास बंदी**लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान केंद्रापासून १०० मीटर परिसरात मोबाईल आणण्यास बंदी घालण्यात आली आहे. मतदानाची सर्व प्रक्रिया गोपनीय आहे. मतदान केंद्रावरील गोपनीयतेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. मतदारांच्या गोपनीयतेसाठी मतदान केंद्रापासून १०० मीटर परिसरात मोबाईल आणण्यास बंदी घालण्यात आली आहे. मतदारांनीही मतदानासाठी येताना मोबाईल आणू नयेत, असेही आवाहन जिल्हाधिकारी श्री. क्षीरसागर यांनी केले आहे.मतदान हा भारतीय संविधानाने दिलेला मौलिक हक्क आहे. प्रत्येक नागरिकाने मतदान करून या मौलिक अधिकाराचा वापर करीत भारतीय लोकशाही बळकटीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी व्हावे. - राजेंद्र क्षीरसागर, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

# अल्ताफ दादासाहेब शेख यांनी संगीत दिग्दर्शन केलेले लोरी हिंदी चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर चांगलाच प्रतिसाद ५ दिवसात साडेचार करोडचा गल्ला

प्रेक्षकांचा चांगलाच प्रतिसाद भेटत आहे, स्टार लाईट इंटरनॅशनल स्कूल संस्थापक अध्यक्ष हिमांशू (आप्पा वाघमारे) आणि अभिनेत्री जागृती जाधव आणि खोपोली महानगरपालिकेचे अधिकारी जाधव सर यांनी अल्ताफ शेख यांना शुभेच्छा दिल्या अल्ताफ दादासाहेब शेख यांचे संगीत दिग्दर्शन असलेल्या 'लोरी महाराष्ट्र राज्य आणि संपूर्ण भारतात आपल्या जवळचे चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आहे. प्रेक्षकांचा चांगलाच प्रतिसाद भेटत आहे, बॉक्स ऑफिसवर पाच दिवसांपर्यंत साडेचार करोडचा गल्ला जमा केला आहे, दुसरा आठवडा सिनेमागृहात पुन्हा जोर धरला आहे

उर्मिला धनगरी यांनी गायलेल्या हुका बड़ा नशीला आणि ममता की मूरत सुरेश वाडकर यांनी गायलेल्या गाणं प्रेक्षकांच्या चांगलाच पसंती तो उतरले आहेत. अल्ताफ दादासाहेब शेख यांचे संगीत दिग्दर्शन असलेल्या लोरी हिंदी चित्रपट संगीत दिग्दर्शनासोबत अल्ताफ शेख यांनी या चित्रपटाची गीत लिहिलेले आहेत अल्ताफ साहेब शेख यांचा २०१८ ला वेडा बी एफ रिलीज झालेला या चित्रपटातील बॉलीवूड सिंगर अल्ताफ राजा यांनी गायलेली हे माझे दुर्वेश बाबा कव्वाली ही वर्ल्ड रेकॉर्ड झाली




होती आणि बॉक्स ऑफिस कलेक्शन हे अकरा करोड च्या पुढे झालं होतं, या चित्रपटाचे यश पाहून अविनाश कवठणकर आणि राजू रेवणकर यांनी अल्ताफ दादासाहेब शेख यांना संगीत दिग्दर्शनाने गीत लेखनाची कामगिरी सोपवली होती. साईराम अ क्रिएटिव्ह वर्ल्ड'ची प्रस्तुती असलेल्या लोरी चित्रपटाच्या पुणे येथील मिराज सिनेमागृह येथील शो ला चित्रपटाचे निर्माते अविनाश कवठणकर, दिग्दर्शक राजू रेवणकर, संगीत दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख, सुधीर कुमार हजेरी,

सुप्रसिद्ध सिंगर सुरेश वाडकर स्वप्निल बांदोडकर उर्मिला धनगर प्रियंका बर्वे आणि अंजली गायकवाड या दिग्गजानी लोरी चित्रपटाची गाणी गायले आहेत.

डीओपी कुमार डोंगरे, पणती पटेल, राजकुमार, अली शेख, शान कक्कर, रंजीत दास, अभिलाषा घैरा, प्रतिभा शिंपी, आरती शिंदे; तर आर्ट - राजू माळी, मेकअप- केतन, कॉस्ट्यूम- संगीता चौरे आणि आरती पाटील , लाईन प्रोड्यूसर- शाहजहां शेख, प्रोडक्शन मैनेजर- अमजदखान शेख, किरण घोडके, अभिषेक चौरे, हर्ष राजे, मेकअप - किरण सिद्दीद्दी प्रेक्षकांसह अल्ताफ शेख या चित्रपटातली गाणी संगीत आणि कथा प्रेक्षकांना खेळवून ठेवण्यासारखे आहे

# मतदानाच्या दिवशी दिव्यांग मतदारांसाठी धावणार बस; जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून बस सेवेचे उद्‌घाटन

मुंबई उपनगर : 'एकही मतदार मागे राहू नये या संकल्पानुसार मुंबई जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांसाठी २० मे २०२४ रोजी मतदानासाठी विशेष विनामूल्य बस सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने आज जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या बस सेवेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रत्यक्ष दिव्यांग बांधवांशी जिल्हाधिकारी श्री. क्षीरसागर यांनी संवाद साधला.आज वांद्रे पूर्व येथील मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात दिव्यांग मतदारांसाठी विनामूल्य बस सेवेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी मनोज गोहाड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी तेजस समेळ, जिल्हा दिव्यांग समन्वय अधिकारी प्रसाद खैरनार उपस्थित होते. मुंबई उपनगर जिल्ह्यात ४ लोकसभा मतदारसंघात २० मे २०२४ रोजी लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. त्यादृष्टीने विधानसभा मतदारसंघानिहाय ठरविलेल्या एका निश्र्चित



मार्गावर ६१३ ठिकाणी बेस्ट मार्फत व्हिलचेअर प्रवेश योग्य मोफत बस सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रावर जाऊन मतदान करता यावे यासाठी ११०६ व्हिलचेअर देखील मतदान केंद्रांवर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. इझी टु मुव्ह या संकल्पने अंतर्गत ज्या विधानसभा मतदारसंघात लोकोमोटर म्हणजेच अस्थिव्यंग मतदारांची संख्या तुलनेने अधिक आहे. अशा ९ विधानसभा मतदारसंघात व्हिलचेअर क्सेसीबल टॅक्सींची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक विधानसभा मतदारसंघानिहाय २५ लोफ्लोअर ईलेक्ट्रीक व्हिलचेअर क्सेसीबल बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# पंढरपुरातील महा-ई-सेवा केंद्र करतात महसुलच्या नावाने वसुल, तहसिल कार्यालयातही खासगी एजंटचा सुळसुळाट, पालक व विद्यार्थी हैराण!

## प्रांताधिकारी यांनी लक्ष घालावे अन्यथा मोठे जनआंदोलन उभारु! : गणेश अंकुशराव

**पंढरपुर/प्रतिनिधी**

सध्या विविध शालेय व महाविद्यालयीन परीक्षा झालेल्या असून त्यांचे निकाल घोषित होत आहेत. यानंतर पुढील शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशासाठी आवश्यक असणार्या विविध कागदपत्रांसाठी अनेक विद्यार्थी व पालकांची महा-ईसेवा केंद्र तसेच तहसिल कार्यालयात मोठी गर्दी होताना आढळते, परंतु तहसिल कार्यालयातील संबंधित प्रमाणपत्रे देण्यासाठी जी यंत्रणा आहे त्या ठिकाणी कर्मचारी कमी असल्यामुळे विद्यार्थ्यांना वेळीच कागदपत्रे मिळत नाहीत, विलंब लागल्याने पालकांसह विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत असुन कागदपत्रं (विविध शासकीय प्रमाणपत्रं) मिळवण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे त्यामुळे तहसिल मधील संबंधित विभागातील कर्मचार्यांची संख्या वाढवावी व कागदपत्रांसाठी पालकांची लुटही होत असल्याचे निर्दशनास आले असुन याकडेही लक्ष घालावे. अशी मागणी पंढरपुरातील महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी पंढरपुरचे प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्याकडे केली आहे.




सध्या पुढील शैक्षणिक प्रवेशासाठी लागणारे दाखले जसे की, उत्पन्न, डोमिसाईल, नॉनक्रेमीलेअर, जातीचा दाखला शेतकरी दाखला असे विविध दाखले काढण्याकामी विद्यार्थी व पालक अर्ज दाखल करीत आहेत. परंतु उत्पन्न, डोमिसाईल, शेतकरी दाखला मिळणेस पंधरा दिवस व नॉनक्रेमीलेयर मिळणेस ४५ दिवस लागत असल्याचे विद्यार्थी व पालक सांगत आहेत.

विद्यार्थी व पालकांनी वेळेत दाखले काढणे गरजेचे असले तरी अनेक पालक अशिक्षित असल्याने ऐनवेळी दाखले काढण्यासाठी गर्दी होते व दाखले वेळेवर मिळत नाहीत. जर आपण सदर कामी जास्त कर्मचारी दिल्यास सध्या दाखले देण्यासाठी जो वेळ दिला जात आहे तो कमी होईल व विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय थांबेल व प्रशासनावर येणारा ताणही कमी होईल. याचसोबत तहसिल कार्यालयातील झिरो कर्मचारी (खासगी एजंट) व कांही महा ई सेवा केंद्रावर कागदपत्रांसाठी अव्वाच्या सव्वा शुल्क आकारुन पालकांची लुट करत आहेत, त्याकडेही लक्ष घालावे, तरी आपण व्यक्तीश: यात लक्ष घालावे व पालकांना दिलासा द्यावा. अशी विनंती गणेश अंकुशराव यांनी निवेदनाद्वारे प्रांताधिकारी यांना केली आहे. या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करु. असा इशाराही गणेश अंकुशराव यांनी दिला आहे. यासंबंधीचे निवेदन त्यांनी प्रांताधिकारी यांच्यासह मुख्यमंत्री, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांनाही पाठवले आहे.

# दैनिक यशसिध्दि न्यूजचे संपादक मा.कमलाकर सोनकांबळे यांचा वाढदिवस विविध संस्था व मान्यवरांकडून शुभेच्छा देवून साजरा



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे वतीने सत्कार करताना सचिव विश्र्वनाथ चव्हाण, बसवराज बिराजदार, दयानंद दणुरे, योगेश कबाडे, समाधान अहिरे, निगपा निबाळ यांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले



दर्शनाळ ग्रामपंचायत सदस्य आकाश माने यांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले



इराण दसाडे संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती दुधनी यांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले



धोडूराज बनसोडे मित्र परिवारातर्फे सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ अक्कलकोट तालुक्याच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुका उपाध्यक्ष अंबादास गायकवाड यांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले



भाजपा अनु विभाग तालुकाध्यक्ष निजपा गायकवाड यांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले



सागर दादा कल्याणशेट्टी युवा मंच अध्यक्ष शाम बाबर यांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले



सदाफुले वाहक यांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले



शाम बाबरङ्गयांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले



मकबूल कणमुसे यांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले



वागदरीचे माजी तंटामुक्त समिती अध्यक्ष राज यादव यांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले



भाजपा युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष सुनील सावंत यांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले



किरण गायकवाड मित्र परिवारातर्फे सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले



वागदरी ग्रामपंचायत जेष्ठ सदस्य श्रीशैल ठोंबरे यांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले

# बाळासाहेबांनी उद्धव यांना मुख्यमंत्री केलेच नसते! मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दावा

ठाणे: मुख्यमंत्री होण्याची सुप्त इच्छा उद्धव ठाकरे यांच्या मनात पूर्वीपासून होतील, असा दावा एकनाथ शिंदे यांनी 'लोकसत्ता'ला दिलेल्या विशेष मुलाखतीत केला. आज त्यांच्याकडून गद्दारीची भाषा केली जाते. बाळासाहेबांच्या विचारांशी गद्दारी कुणी केली हे अवघ्या महाराष्ट्राने पाहिले आहे. महाराष्ट्राच्या जनतेसोबत, बाळासाहेबांच्या विचारांबरोबर, भाजपशी त्याचवेळी यांनी बेईमानी केली होती. भाजपबरोबर आपण राहिलो तर कधीच मुख्यमंत्री होता येणार नाही हे उद्धव यांना माहीत होते. त्यांना कोणत्याही परिस्थितीत मुख्यमंत्री व्हायचे होते. त्यामुळे ठरावीक हस्तकांकरवी त्यांनीच शरद पवारांना तसा निरोप पाठविला असे शिंदे यांनी नमूद केले.

आज ते म्हणतात, मला मुख्यमंत्री व्हायचे नव्हते. हे साफ खोटे आहे. त्यांना मुख्यमंत्री होण्याची सुप्त इच्छा होतीच. हेही पुन्हा बाळासाहेबांच्या विचारांशी विसंगत होते. शिवसेनाप्रमुखांना कधीच सत्तेची लालसा नव्हती. त्यांना सर्वसामान्य शिवसैनिक मुख्यमंत्री व्हावे असे वाटायचे. शिवसेनाप्रमुखांनी उद्धव ठाकरेंना कधीच मुख्यमंत्री केले नसते, असा दावा मुख्यमंत्री शिंदे यांनी केला. मी किमान पाच वेळा तरी त्यांना भाजपसोबत युती करा असे सांगितले होते. त्यांना ते मान्य नव्हते. कारण मुख्यमंत्री पदावर त्यांचा डोळा होता.



राज्यातील उद्योग गुजरातला पळविले जात आहे हा विरोधकांचा प्रचार मुळात हास्यास्पद आहे, असे मुख्यमंत्र्यांचे म्हणणे. ''वेदांतसारखा मोठा प्रकल्प जेव्हा गुजरातला गेला तेव्हा सत्तेत येऊन आम्हाला दोन महिनेही झाले नव्हते. महाविकास आघाडी सरकारच्या काळातील नकारात्मकतेमुळे हा प्रकल्प गुजरातला गेला. आमच्या सरकारच्या काळात राज्याला उद्योगस्नेही बनविण्यासाठी आम्ही ठोस धोरणे आखली. गेल्या दोन वर्षांत पाच हजार कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात आणण्यात आम्हाला यश मिळाले आहे. गडचिरोलीसारख्या जिल्ह्यामधे टाटा, जिंदालसारखे उद्योग समूह उद्योग थाटण्यासाठी पुढे येत आहेत. पूर्वी एखादा प्रकल्प राज्यात आणताना 'माझे काय' असे त्यांची भूमिका असायची. हे चित्र आम्ही बदलले आहे,'' असे शिंदे म्हणाले.

''देशात सलग तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी हे पंतप्रधान होणार हे स्पष्टच आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्राच्या विकासासाठी मोदींना साथ देणे महत्वाचे आहे. राज्याच्या विकासात केंद्र सरकारची नेहमीच महत्वाची भूमिका असते. रारखडलेले प्रकल्प मार्गी लागले आहेत. मुंबईत मेट्रो, रस्त्यांची कामे वेगाने सुरु झाली आहेत. नवी मुंबई विमानतळाचे काम शेवटच्या टप्प्यात आहे. समृद्धी महामार्गाचा शेवटचा टप्पा सुरू होतो आहे. मुंबई, ठाणेकरांचे जगणे सुसह्य व्हावे यासाठी हे सरकार धडपडत आहे हे येथील नागरिक पाहात आहेत. राज्यात भाजप–शिवसेनेचे सरकार असताना सुरू झालेले अनेक प्रकल्प महाविकास आघाडी सरकारच्या काळात बंद पडले. यातील अनेक प्रकल्प पुन्हा वेगाने सुरू झाले आहेत.

**माझ्यावर दिल्लीचा कंट्रोल हा अपप्रचार**

मुख्यमंत्री पदावर असूनही तुमच्या दिल्लीचा कंट्रोल असल्याची चर्चा असते या प्रश्नावर, ''हे पुन्हा विरोधकांनी रचलेले कथानक आहे'', असे उत्तर मुख्यमंत्र्यांनी दिले.

# अवैधरीत्या गर्भपात जाळे चालवणारी आशा कार्यकर्तीसह तिघे अखेर गजाआड

छत्रपती संभाजीनगर : वाळूजनजीकच्या बकवालनगरात आशा कार्यकर्तीने चालविलेले गर्भपात प्रकरण गंगापूरच्या आरोग्य विभागाने जानेवारी महिन्यात उघडकीस आणले होते. यातील मुख्य आरोपी महिला कार्यकर्ती पसार होती. तिला पैठण तालुक्यातील रहाटगावातून अटक करण्यात आली असल्याची माहिती वाळूज पोलिसांनी दिली. अटक केलेल्या महिलेचे नाव वैशाली रवींद्र जाधव असे आहे. वैशाली जाधवने दिलेल्या कबुली जबाबानंतर पोलिसांनी शुक्रवारी सुनील लहुराव मेघारे, गणेश सोनाजी सवंडकर यांना अटक करण्यात आली आहे. या दोघाकडून गर्भपात करणाऱ्या गोळयांची कीट जप्त करण्यात आली.आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी गावपातळीवर आरोग्य विभागाने वैशाली जाधव या आशा कार्यकर्तीची नियुक्ती केली होती. मदर केअर बिल्डींगमधून सदर महिला सेवा देण्याचे काम करायची. यात केंद्रात गर्भलिंग निदान चाचणी करून महिलाचे गर्भपात केले जात असल्याची तक्रार काहींनी



हेल्पलाईनव्दारे थेट पुणे येथील सबंधित विभागाकडे केली होती.तक्रार प्राप्त होताच गंगापूरचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रमेश पवार यांच्या पथकातील डॉ. सुदाम लगास यांनी ३० जानेवारीला बकवालनगर पोलिसासह गाठले होते. पथकाने याविषयीची चौकशी करून वाळूज पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती.